**<u>प्रेसनोट</u>** दि. 01/04/2026

# ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणेकडून कान्हुरमेसाई ग्रामपंचायत कर्मचारी यांचे विरोधात लाच मागणी प्रकरणी कारवाई केलेबाबत.

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | शिक्रापूर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण **गु.रजि.नं.** 273/2026 |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे **कलम** 7 अ |
| तक्रारदार | पुरुष, वय 40 वर्षे |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | भरत पोपट गायकवाड, कान्हुरमेसाई ग्रामपंचायत कर्मचारी, वय 46 वर्षे, रा.कान्हूरमेसाई, ता शिरूर जि पुणे. **(वर्ग- 4)** |
| सुरवातीची लाच मागणी | रु. 10,000/- ते 15,000/- (दहा ते पंधरा हजार रूपये) |
| पडताळणी दरम्यान लाच मागणी | एकुण 2,000/- (दोन हजार रूपये) |
| पडताळणी दिनांक | दि. 06/01/2026 |
| सापळा अधिकारी यांचे नाव व पद | श्री. सतीश वाळके, सहा. पोलीस आयुक्त, लाप्रवि, पुणे (मो.क्र.8087002020) |
| तपास अधिकारी यांचे नाव व पद | श्रीमती शैलजा शिंदे, पोलीस निरीक्षक, लाप्रवि, पुणे (मो.क्र. 7722011255) |

**थोडक्यात माहिती :-** तक्रारदार हे कान्हूरमेसाई गावतील रहिवासी असून त्यांच्याच गावातील काही रहिवाशांनी तक्रादाराच्या जागेत अतिक्रमण करून घर बांधून त्याबाबत ग्रामसेवकाकडून 8 अ चा उतारा तयार करून घेतला आहे त्यावेळी संबंधित ग्रामसेवकाने कोणतीही कागदपत्र न पाहता उतारा तयार करून दिला होता. त्याबाबत तक्रारदाराने गटविकास अधिकारी, पंचायत समिती, शिरूर यांच्याकडे तक्रार अर्ज दिला होता. त्यानंतर गटविकास अधिकारी पंचायत समिती शिरूर यांनी तो अर्ज चौकशीसाठी कान्हुरमेसाई ग्रामपंचायतचे ग्रामसेवक यांच्याकडे पाठवून देऊन अहवालाची मागणी केली होती. त्याप्रमाणे अर्जाची चौकशी करून स्थळ पाहणी करून गटविकास अधिकारी शिरूर यांना अहवाल पाठविण्यासाठी तक्रारदाराकडे ग्रामपंचायतचे कर्मचारी यातील लोकसेवक यांनी स्वतः साठी व ग्रामसेवक श्री घासले यांचेसाठी 10 ते 15 हजार रूपयांची लाचेची मागणी केली असल्याची तक्रार तक्रारदार यांनी दि. 09/12/2025 रोजी ॲंटी करप्शन ब्युरो, पुणे येथे दिली होती.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने लाचलुपत प्रतिबंधक विभागाने दिनांक 06/01/2026 रोजी केलेल्या लाच मागणी पडताळणी कारवाईचे वेळेस ग्रामपंचायत कर्मचारी भरत पोपट गायकवाड यांनी तक्रारदाराच्या वरील कामासाठी तक्रारदाराकडे स्वतः साठी व कान्हूरमेसाई ग्रामपंचायतचे ग्रामसेवक श्री घासले यांचेसाठी 2,000 रूपयांची लाच मागणी केल्याचे निष्पन्न झाले आहे.

आरोपी लोकसेवक भरत पोपट गायकवाड, कान्हुरमेसाई ग्रामपंचायत कर्मचारी याच्याविरुध्द शिक्रापूर पोलीस स्टेशन पुणे ग्रामीण येथे गु.रजि.नं. 273/2026 कलम 7 अ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 प्रमाणे दि.01/04/2026 रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी भरत पोपट गायकवाड यास दि. 01/04/2026 रोजी 19.05 वाजता अटक केले आहे.

**सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री.शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, पुणे व अपर पोलीस अधीक्षक श्री. अजीत पाटील, ला.प्र.वि. पुणे, अपर पोलीस अधीक्षक श्री. अर्जुन भोसले, ला.प्र.वि. पुणे, यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली. लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील क्रमांकवर सपंर्क साधण्याचे आवाहन श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे (मो.क्र. 9823167154) तसेच अपर पोलीस अधीक्षक-1 श्री. अजीत पाटील, ला.प्र.वि.,पुणे (मो.क्र. 9029030530) यांनी केले आहे.**

1) **ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे- दुरध्वनी क्रमांक** -020-26122134, 26132802, 26050423, **9403781064**
2) **व्हॉट्स-ॲप क्रमांक -** 9403781064 (पुणे), 9930997700 (मुंबई)
3) **ई-मेलआयडी - पुणे** dyspacbpune@mahapolice.gov.in
4) **वेबसाईट** - www.acbmaharashtra.gov.in
5) **ऑनलाईन ॲप तक्रार** - www.acbmaharashtra.net.in

दयानंद गावडे
सहा.पोलीस आयुक्त / पो. उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.